**संदर्भ :-** १) शासन निर्णय गृहविभाग क्र.बीयुडी-०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दि.१०/०४/२०१७,
२) शासन निर्णय गृहविभाग क्र.बीयुडी-०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दि.१९/०८/२०१७,
३) या कार्यालयाची ज्ञापने क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/३८/२०१७, दि. ०७.०७.२०१७ आणि
४) क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/९३/२०१७, दि. १५.११.२०१७

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाकरिता बँकामार्फत कर्ज व्यवस्था

******

**परिपत्रकीय आदेश :-**

राज्यातील शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना राहण्याकरिता स्वत:चे निवासस्थान उपलब्ध व्हावे याकरिता त्यांना गृह कर्ज उपलब्ध करण्याच्या हेतूने शासनाने घरबांधणी अग्रीम योजना सुरु केली आहे. त्याअनुषंगाने मुंबई वित्तीय नियम, परिशिष्ट २६, अधिसूचना वित्त विभाग दि. २८/०७/१९६२ अन्वये घरबांधणी अग्रीम योजना कार्यान्वित केली आहे. त्याव्दारे शासन अर्थसंकल्पात तरतूद करुन प्रत्येक विभागाकरिता '७६१०' या लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्या निधीची वार्षिक उपलब्धता आणि पोलीस विभागात घर बांधणी अग्रीमाकरिता अर्जांची संख्या अधिक असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना मालकीचे घर घेण्यास विलंब लागत होता. ही बाब विचारात घेऊन शासनाने गृह विभाग निर्णय क्र. बीयुडी ०११७/प्रकरण २/आस्था-१, दि. १०/०४/२०१७ अन्वये राज्यातील पोलीस दलातील विविध संवर्गातील कर्मचारी यांच्यासाठी घरबांधणी अग्रीमाकरिता बँकाकडून कर्ज घेऊन ते महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत पोलीस कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली आहे. ही योजना कार्यान्वित करण्याकरिता शासनाने एचडीएफसी या वित्तीय संस्थेशी करार केला आहे.

२. सदर योजना ही त्वरीत प्रदान होणारी नाविन्यपूर्ण असून, त्या योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी तसेच त्यामध्ये पारदर्शकता असावी, लेखे परिपूर्ण आणि अद्ययावत ठेवावेत याकरिता अर्ज 'ऑनलाईन' भरुन त्यांची छाननी होऊन त्यावर त्वरीत निर्णय घेण्याकरिता संगणकीय मृदुप्रणाली (सॉफ्टवेअर) विकसित करण्यात आली आहे. अर्जाची छाननी आणि अनुज्ञेयता याकरिता शासनाचे प्रचलित नियम विचारात घेतले जातील आणि असे नियम विचारात घेऊनच सॉफ्टवेअरमध्ये तरतूद केली आहे. माहितीमध्ये त्रुटी अगर उणिवा राहिल्यास सॉफ्टवेअर तो अर्ज तात्काळ अमान्य करेल. अशा प्रकारे शासनाच्या विहित नियमांच्या आधारे मुळ कागदपत्रांची तपासणी करुन घटक कार्यालये त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले परिपूर्ण अर्ज, त्वरेने काटेकोर तपासणी करुन तपासलेल्या अर्जांची माहिती सॉफ्टवेअरव्दारे पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करतील. ऑनलाईन माहिती भरण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात बिनतारी संदेश विभागातील तंत्रज्ञ हे Technical Support Provider म्हणून काम करतील. संबंधीत लिपिकांना सदर फॉर्म भरण्यास काही समस्या निर्माण झाल्यास ते त्याकरिता मदत करतील.

३. अशा माहितीला पोलीस महासंचालक कार्यालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर ती माहिती पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्याकडे कर्जाच्या मागणीकरिता पाठविली जाईल. महामंडळाकडून ती माहिती एचडीएफसी या वित्तीय संस्थेला सादर केली जाईल. अंतिमत: केलेल्या मागणीप्रमाणे एचडीएफसी कडून कर्ज रुपाने रक्कम महामंडळाच्या बँकेत जमा होईल. महामंडळ ती रक्कम पोलीस महासंचालकांच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यामध्ये जमा

करेल. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सदर रक्कम एनईएफटी (NEFT) किंवा RTGS व्दारे घटक कार्यालयांना त्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे वितरीत केली जाईल. सदर बाबत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) यापुढे पोलीस अधिकारी / पोलीस कर्मचारी यांची माहिती, विवरणपत्रातून पाठविण्यात येऊ नये. तथापि, अर्जदारांचे अर्ज व कागदपत्रे कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अभिरक्षेत ठेवावीत. भविष्यात त्याची तपासणी करण्यात येईल. तसेच यापूर्वी ज्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची घरबांधणी अग्रीम मिळण्याकरिता पोलीस महासंचालक कार्यालयास माहिती सादर केली आहे, तथापि, त्यांना अग्रीम मंजूर झालेला नाही. त्यांचे अर्ज पुन्हा ऑनलाईन मंजुरीकरिता सादर करावेत. पूर्वी सादर केलेल्या माहितीनुसार त्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना या कार्यालयाकडून घरबांधणी अग्रीम रक्कम वितरीत केली जाणार नाही.

(२) सदर संगणकीय प्रणालीमध्ये घटक कार्यालयांनी अर्जदाराची माहिती भरुन झाल्यानंतर तो संगणीकृत अर्ज पुढे आहरण व संवितरण अधिकारी (कार्यालय अधीक्षक) यांच्याकडे Verify करावयास जातो. त्यानंतर त्यांनी Verify केल्यानंतर तो संगणीकृत अर्ज घटक प्रमुखांकडे मान्यतेकरिता जातो. त्या टप्प्याच्या वेळी जर माहितीमध्ये कांही त्रुटी आढळून आल्यास किंवा माहिती भरतांना काही चूक झाल्यास अथवा उणिवा राहिल्यास आणि त्या दुरुस्त करणे आवश्यक असेल तेव्हा, घटक प्रमुखांना सदर अर्ज फेटाळता येईल. त्यानंतर संबंधीत लिपिक (Inputter) Modify (सुधारणा) वर Click करुन माहिती भरु शकेल.

(३) <u>अग्रीमाची रक्कम घटक कार्यालयांनी त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये जमा झाल्यानंतर त्याच दिवशी किंवा कमाल दुसऱ्या दिवसा अखेरपर्यंत अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक राहील.</u>

(४) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १४/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील तरतूदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग पहिला, उपविभाग-एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये विभाग प्रमुख संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम मंजूर केल्याचे आदेश निर्गमित करतील.

(५) <u>'७६१०' या लेखाशिर्षाखाली यापूर्वी शासन निधीतून अंशत: अथवा पूर्णत: घरबांधणी अग्रीम मंजूर केले असल्यास त्याचा समावेश या योजनेमध्ये होणार नाही.</u> याची विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख दक्षता घेतील.

(६) ही योजना लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना लागू राहणार नाही. त्यांना '७६१०' या लेखा शिर्षाखाली शासन निधीतून अग्रीम पूर्वीप्रमाणेच मंजूर करण्यात येईल. त्याप्रमाणे कागदपत्रांची नियमाप्रमाणे तपासणी करुन विहित विवरणपत्रातून माहिती सादर करावी.

(७) प्रस्तुत प्रकरणी देयके कोषागारात सादर करुन रक्कम आहरित करण्याची आवश्यकता नसल्याने पोलीसांना रक्कम त्वरीत मिळू शकणार आहे.

(८) अग्रीमाची रक्कम संबंधीत अग्रीम धारकाच्या बँक खात्यात जमा केल्यानंतर त्याबाबतची नोंद शासन निर्णय, वित्त विभाग दि. २०/०२/२०१५ मधील परिच्छेद ८ (८) आणि शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अग्रीम-